RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 June 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 June 2014

अजायब ✲ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : बारावा | जून २०१४

अमृतवेळ (ध्यान अभ्यासास बसविण्यापूर्वीचा संदेश) 4

नामाचा नशा (सत्संग) 9

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 21

एकाग्रता (पवित्र गुहेदर्शना आधी दिलेला संदेश) 31

धन्य अजायब (अहमदाबादमधील कार्यक्रमाची माहिती) 34

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

अमृतवेळ

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींना ध्यान-अभ्यासापूर्वी दिलेला संदेश
संतबानी आश्रम,१६पी.एस. राजस्थान

ध्यान अभ्यासास बसण्यापूर्वी तुम्ही तुमच्या मनास शांत करणे अतिशय महत्त्वाचे आहे, कारण शांत मनच ध्यान-अभ्यास करू शकते.ध्यान-अभ्यासास ओझे न समजता, तो प्रेमाने व मनोभावे करावा. आपण असा गैरसमज करुन घेऊ नका की जी काही मिनिटे, जे क्षण परमेश्वराच्या आठवणीत आपण व्यतीत करतो, त्याची कोठेही नोंद होत नाही. गुरु नानक देवजी सांगतात:

हर धन के भर लेहो भंडार, नानक गुरु पूरे नमस्कार ।

आपण जो काही थोडा-थोडा ध्यान-अभ्यास करीत आहोत, तो एक प्रकारे आपण पारमार्थिक जमापुंजी गोळा करण्याची क्रिया करीत आहोत. जिवात्म्यास जरी जाणीव नसली की ध्यान-अभ्यास केल्याने आपली जमापुंजी गोळा होत आहे, परंतु आपण जे काही नामस्मरण व ध्यान-अभ्यास करतो, त्या प्रत्येक क्षणाचा हिशोब सतगुरु ठेवीत असतात. फरक इतकाच असतो की सतगुरुंनी जर आपणांस या जमापुंजीची कल्पना अंतर्यात अनुभूत करुन दिली, तर आपण अजाण जीव ती व्यर्थ ठिकाणी अशाप्रमाणे खर्च करू, ज्याप्रमाणे एखाद्या अजाण बालकास पौंडची (इंग्लंडचे चलन) किंमत माहित नसते व तो ते पौंड व्यर्थ गमावतो. परंतु जर मुलगा समंजस असला तर पिता स्वत: कमावलेली जमापुंजी सुद्धा त्याच्या हवाले करतो.

आपण या पारमार्थिक जमापुंजीचा वापर या जगात मान-पान मिळविण्या साठी अथवा आजारपण दूर करण्यासाठी व्यर्थ खर्च करतो. म्हणून सतगुरू आपली पारमार्थिक जमापुंजी गुप्तपणे सांभाळून ठेवतात, जेणेकरुन मुलाने ती जमापुंजी व्यर्थ गमावू नये. जो शिष्य पोलादी हृदयाने (दृढ निश्चयाने) ध्यान-अभ्यास करतो, सतगुरुंच्या स्मरणात सदैव निमग्न रहातो, त्याच्या हृदयात केवळ सतगुरुच वास करतात, इतर संसारीक विचार नाहीसे होतात.

ज्याच्या हृदयात केवळ नामच सामावलेले असते आणि इतर संसारीक विचारांचा लवलेशही नसतो, तोच खरा सुफी (पवित्र) आत्मा आहे. असा पवित्र आत्मा जेव्हा ध्यान–अभ्यासासाठी बसतो, तेव्हा सर्व देवी–देवता देखील तेथे प्रकट होऊन त्यास चोहोबाजुंनी वळसा घालतात व त्याचा जयजयकार करतात की या मातृलोकात देखील हा सुफी आत्मा ध्यान–अभ्यासासाठी बसलेला आहे! अशा शिष्याचे पवित्र हृदय पाहून सतगुरू त्याच्या अंतर्यात आपली सर्व पारमार्थिक विपुलता घेऊन विराजमान होतात व केवळ त्याच्या हक्काचीच नव्हे तर त्यांनी स्वत: कमावलेली पारमार्थिक जमापुंजी देखील त्यास देतात. परमात्म्याची भक्ती अमूल्य धन आहे, जी आर्थिक मोल चुकते करुन किंवा जोर–जबरदस्तीने प्राप्त केली जाऊ शकत नाही. भक्ती एखाद्या ठराविक कुटुंबासच मिळत नाही.

भक्ति भक्तन हूं बन आई।

भक्ती केवळ भक्तांचीच मालमत्ता असते. स्त्री–पुरुष, मालक–नोकर, कोणीही भक्ती करून सतगुरूंद्वारे भक्तीधन प्राप्त करू शकतो. भक्ती ही काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या सर्वांचा विनाश करते. हे विकाररूपी पाच डाकू शिक्षण प्राप्तीने किंवा समाज बदलल्याने काबूत येत नाहीत. ते केवळ शब्दनामाची भक्ती केल्यानेच काबू येतात. कबीर साहेब म्हणतात :

मन मूसा पिंगल पया पी पारा हर नाम ।

अनुभवी लोक सांगतात की, उंदीरास पारा पाजल्यास, तो मरत नाही, परंतु जिवंत असूनही तो कोणत्याही प्रकारची हालचाल करू शकत नाही. अशीच अवस्था आपल्या मनाची असते. खरे सुख व खरी शांती तसेच खरा मानसन्मान आपणांस निजधामास, सचखंडास पोहचूनच प्राप्त होऊ शकतो. देवी–देवता तसेच राजे–महाराजे देखील खऱ्या सुख–शांतीच्या शोधात फिरत असतात, परंतु ते खरे सुख आणि खरी शांती या जगातील सत्ता चालविण्यात तसेच संसारीक धन–संपत्तीमध्ये नाही.

केवळ सतगुरुच आपल्यावर खरे प्रेम करतात, बाकी संसारीक प्रेमात अशांती व स्वार्थ दडलेला असतो. परमात्म्याची ही रीत (तत्व) आहे की ज्यास त्याने एकदा का मोक्षपदाचा सन्मान बहाल केला व आपल्या घरात (सचखंडात) स्थान दिले, की मग तो ते दिलेले बक्षीस माघारी कधीही घेत नाही. गुरू नानक देवजी महाराज म्हणतात :

ऐह रीत चली भगवंत।

आपण या जगातील मान–सन्मानाबद्दल जाणतोच की जे लोक एखाद्या व्यक्तीस मानसन्मान देतात, त्याचा उदो–उदो करतात, त्याची वर्तमानपत्रात जाहिरात देतात, त्याच्यावर पुष्पवृष्टी करतात, परंतु जेव्हा त्या व्यक्तीचा विरोधी पक्ष उचल खातो व त्याच्या हातून सत्ता निघून जाते, तेव्हा तेचलोक

त्या व्यक्तीची वर्तमानपत्रांमध्ये निंदा–नालस्ती करतात, त्याच्या गळ्यात चपलांचा हार घालण्यास देखील मागेपुढे पहात नाहीत.

आपला परिपूर्ण परमात्मा मात्र आपणांस (मोक्षपदाचा) सन्मान देऊन पस्तावत नाही, उदास होत नाही. म्हणूनच भक्ती ही खऱ्या सुखाची व मान–सन्मानाची दाता आहे. परंतु भक्तीरूपी धन आपण स्वत:हून प्राप्त करू शकत नाही, त्यासाठी एखाद्या संत–सतगुरुंच्या शरणी जाणे गरजेचे आहे. गुरु नानक देवजी महाराज म्हणतात :

साधसंग अगन सागर तरिए।

आपल्या अंतर्यात अग्नीचा विशाल समुद्र आहे, ज्याविषयी ऐकताच जग भितीने थर थर कापू लागते. सतगुरु सावन सिंहजी महाराज सांगत असत, ''अंतर्यात अग्नीचे मोठ–मोठे खांब आहेत. त्यापैकी एक जरी खांब या जगात आल्यास, हे जग त्याच्या तापाने जळून जाईल. ज्या आत्म्यांनी या जगात कुकर्म केलेली असतात, त्या मलिन आत्म्यांना, त्या तप्त खांबांस मिठ्या मारण्यास भाग पाड्ले जाते. ज्या महापुरुषांनी हे स्वत: अंतर्यात पाहिलेले आहे, तेच ही माहिती सांगतात.'' असे नामरूपी धन संत–सत्गुरूंच्या मदतीशिवाय आपण प्राप्त करू शकत नाही. परमात्म्याचे भक्त परमात्म्यापेक्षा वरचढ ठरतात, कारण त्यांनी परमात्म्यास प्रेमरूपी साखळदंडांनी बांधून, स्वत:वर प्रसन्न करुन आपल्या वशात केलेले असते. संत परमात्म्यासमान नसतात, ते परमात्म्याचे प्रिय पुत्र असतात. प्रियपुत्र त्याच्या वडिलांद्वारे त्यास हवे ते काम करवून घेऊ शकतो. कबीर साहेब म्हणतात :

मेरी बंधी भक्त छुड़ावे।

परमात्मा म्हणतो की, कदाचित मी निर्माण केलेल्या बंधनातून भक्त मुक्त करवू शकतो, परंतु मी मात्र भक्ताच्या बंधनामधून सुटू शकत नाही. मी त्यास विचारू सुद्धा शकत नाही की, माझ्या कोणत्या अपराधाबद्दल तू मला बंधनामध्ये ठेवले आहेस. परमात्म्याने या जीवन–मृत्युच्या संसारात भक्तास महात्म्य प्रदान केलेले आहे. याबद्दल आपण सांगता :

साधु बोले सहज स्वभाव, साधु का बोलया बिरथा न जाए।
जो बोले पूरा सतगुरु सो परमेश्वर सुणया।
सोई वरतया जगत में घट-घट में रमया।

मनमुख व्यक्तीच्या बोलण्यास कोणीही महत्त्व देत नाही. परंतु संत-सतगुरुंचे म्हणणे परमात्मादेखील ऐकतो. संत कोणताही चमत्कार दाखवित नाहीत, ना कोणता खेळ खेळतात. संतांचा सर्वात मोठा चमत्कार पाहावयाचा असल्यास,त्यांच्या एखाद्या शिष्यास मृत्युसमयी त्याचे शरीर सोडताना पाहावे.

सज्जन सेही आखिए जो चलदयां नाल चलन।
जित्थे लेखा मंगिए तित्थे खड़े दसन।

खरा साथी (सजन) तोच असतो जो आपल्या दु:ख व संकट समयी मदतीस धावून येतो. आपण जेव्हा या संसाररूपी समुद्रातून निघून जात असतो (मृत्युसमय), तो समय आपल्यासाठी दु:खद असतो. त्यावेळी आपले बहीण-भाऊ कोणीही आपली मदत करू शकत नाहीत. मृत्यू कधी येईल कोणास ठाऊक? कारण आपल्या मृत्युची वेळ परमात्म्याने ठरवलेली आहे. आपल्या घनघोर अडीअडचणींच्या वेळी आपल्या मदतीसाठी केवळ सत्गुरूच धावून येतात व आपले रक्षण करतात. खरेतर हेच त्यांचे बिरूद आहे.

भक्ती एक असे अमूल्य धन आहे, ज्याची चोर चोरी करू शकत नाही, ज्यास अग्नी भस्मसात करू शकत नाही व पाणी त्यास बुडवू शकत नाही. आपण जी काही थोडीफार भक्ती करतो, ती आपल्या पारमार्थिक भंडारामध्ये जमा होत असते. एक तासासाठी आपल्या मनास सांसारीक कामांपासून परावृत्त करून ध्यान-अभ्यासासाठी बसावे. त्यावेळी केवळ परमात्म्याचीच आठवण असावी व अखंडपणे नामस्मरण करावे. नामस्मरण आत्म्याच्या साफसफाईसाठी एखाद्या झाडूचे काम करते. अंतर्यातील परमात्म्याच्या बसण्याच्या स्थानाची सफाई करण्यासाठी नामस्मरणाचा झाडू नित्यनियमाने मारणे गरजेचे आहे. आता सर्वांनी ध्यान-अभ्यासासाठी बसावे.

***

नामाचा नशा

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
संत कबीर साहेबांची वाणी, ऑस्ट्रेलिया – २ सप्टेंबर १९९५

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी कृपा करुन आपणांस त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली आहे. आपण जे दररोज त्यांच्या आठवणीत बसत आहोत, ही देखील त्यांचीच कृपा आहे.

सर्व संत–महात्मे परमेश्वराचे प्रियजन असून या जगात परमात्म्याच्या हुकामानुसारच येतात. संसारात येऊन सत्याचा संदेश देण्याचा जो परमात्म्याचा त्यांना आदेश असतो, तो संदेश ते देतातच, मग भले तो संदेश देताना त्यांना कितीही अडीअडचणी येवोत. कबीर साहेब या जगात प्रथम जन्म घेणारे संत आहेत, ते कधीही मनुष्य जन्मापेक्षा कनिष्ठ जन्मामध्ये गेले नाहीत. सतयुग, द्वापार, त्रेता व कलियुग या चारही युगांमध्ये त्यांनी या जगात जन्म घेतला. त्यांच्या 'अनुराग सागर' (मराठीत 'प्रेमाचा सागर') या पवित्र ग्रंथात याबद्दलची सर्व माहिती आपण वाचू शकतो.

खरे तर मुल्ला, पादरी, पंडित व पुजारी यांचे रिती–रिवाज अतिशय भिन्न–भिन्न असल्याने त्यांचा आपसात कधीही एकोपा नसतो. ते नेहमीच परमेश्वराच्या भक्तीचा इतरांच्या रिवाजापेक्षा आपला रिवाज श्रेष्ठ आहे असे मानत इतरांच्या रिवाजांचे खंडन करतात. त्यासाठी एक समाज दुसऱ्या समाजाशी वाद घालतो, लढाई करतो. परंतु इतिहास साक्ष देतो की, संतांना दु:ख–कष्ट देण्यासाठी, त्यांच्या संदेशाचा जगात प्रचार होऊ नये यासाठी मात्र हे सर्व समाज एकजुट होतात.

कबीर साहेबांचे पालनपोषण मुसलमान कुटुंबामध्ये झाले. परंतु मुसलमान व हिंदू या दोन्ही धर्मातील लोक त्यांचे विरोधक होते. कबीर साहेब सांगतात:

हिन्दु कहत है राम हमारा, मुसलमान रहमाना ।
आपस में दोऊ लडे मरत है, मरम न काहूं जाना ।।

परमेश्वर प्रिय संत–महात्मा नेहमी हेच सांगतात की, सर्वांचा परमात्मा एकच असून त्याच्या प्राप्तीचा मार्ग देखील एकच आहे. सर्व संत–महात्मा हाच उपदेश करतात की परमात्मा सर्वांच्या शरीरातच आहे. ज्या कोणास तो प्राप्त झाला, तो अंतर्यातूनच प्राप्त झाला व ज्या कोणास तो प्राप्त होईल अंतर्यातूनच प्राप्त होईल. स्वामीजी महाराज म्हणतात:

पंडित भेख पेट के मारे, वे संतन पर करते तान ।
हितकर सन्त उन्हें समझावें वे माने नहीं माने आन ।
उनको चाह मान और धन की परमार्थ से खाली जान ।।

संत–महात्मा अतिशय प्रेमाने समजावतात, प्रियजनहो! आपण सर्वजण परमात्म्याची लेकरे आहोत. हे चालते–फिरते जग जे आपणांस दिसते, ते एखाद्या आपोआप उगणाऱ्या रोपट्याप्रमाणे ऊगले नसून; त्यास बनविणारा कोणीतरी आहे, त्यामागे कोणती ना कोणती शक्ती नक्कीच कार्यरत आहे.

महाराज कृपाल सांगत असत,''जे काम एक मनुष्य करू शकतो ते काम दुसरा मनुष्यदेखील नक्कीच करू शकतो.'' संत असे कधीच म्हणत नाहीत की आम्ही परमात्म्यास पाहिले आहे, परंतु दुसरे कोणी त्यास पाहू शकत नाही. प्रत्येक गोष्ट प्राप्त करण्यासाठी एक ठराविक साधन,मार्ग असतो. आपणांस जर डॉक्टर बनायचे असेल तर आपण एखाद्या डॉक्टरच्या सोबतीत, तसेच इंजिनिअर बनायचे असेल तर एखाद्या इंजिनिअरच्या सोबतीत राहणे गरजेचे आहे. शिष्यास काही नियमांचे पालन करावेच लागते. तसेच परमात्मा प्राप्तीच्या कार्यात शिष्यास पुरेपुर मदत मिळत असते. जे शिष्य ध्यानअभ्यास करीत अंतर्यात जातात, त्यांना कल्पना असते की मार्गात येणाऱ्या प्रत्येक अडीअडचणींवर त्यांचे गुरू उपाय शोधतात व शिष्यास मदत करीत असतात.

इतिहास वाचला असता आपल्या लक्षात येते की, संत–महात्मा या जगात उपजतच परिपूर्ण बनून येतात, तरीही आम्हा परमात्म्याचा विसर पडलेल्या लोकांना प्रत्यक्षित द्यावे म्हणून जे कठोर मेहनत, ध्यान–अभ्यास

करतात. ते त्यांच्या आयुष्यातील अनेक मौल्यवान वर्षे ध्यान–अभ्यासात तसेच परमात्म्याच्या शोधात व्यतीत करतात. या जगातील एखाद्या कामात जर आपणांस यशस्वी व्हावयाचे असेल तर खूप मेहनत करावी लागते. मोती प्राप्त करण्यासाठी आपणांस खोल समुद्रात डुबकी मारावी लागते. सोनेदेखील खोल खाणीमधूनच खणून काढावे लागते. महात्मा प्रेमाने सांगतात :

कल करन्ता अब कर, अब करता सोई ताल ।
पाछे कछु न होवई, सिर पर आया काल ।।

भक्तीमार्गावरून दिशाभूल झालेले आपण जीव आजचे काम उद्यावर ढकलतो की ध्यान–अभ्यास उद्या करू, आता झोपूया. तसेच आजच्या कर्मांची नोंद डायरीत उद्या करू, आज राहू देत. फारतर काय, आपल्या चुकांची माफी सतगुरूंकडून उद्या मागू. यावर संत–महात्मा प्रेमाने म्हणतात, ''घरा–दाराचा, मुला–बाळांचा त्याग करून वा शरीरावर खास प्रकारचे कपडे परिधान करून तसेच आपण राहत असलेला प्रदेश बदलून आपणांस परमात्मा लाभत नाही. कारण तो आपल्या अंतर्यातच आहे.''

विद्यार्जन करण्याची कला प्रत्येक मुलाच्या बुद्धीमध्ये असते. परंतु जी मुले शिक्षकांकडे जातात, त्यांच्या आदेशांचे पालन करतात, मेहनत घेऊन अभ्यास करतात, तो भविष्यात जज, वकील बनतात व पुढील आयुष्य खूप सुखासमाधानाने जगतात. परंतु जी मुले शाळेत जात नाहीत, शिक्षकांच्या आदेशांचे पालन करीत नाहीत. ती मुले वकील–जज बनण्याची अपेक्षा कशी बरे करू शकतात? संत–महात्मा एखादी वस्तू रगडून किंवा घोळून आपल्या शरीरात घालत नसतात. तो परमात्मा आपल्या अंतर्यातच आहे, तो तेथे तुमचीच वाट पहात बसलेला आहे. कबीर साहेब सांगतात:

ज्यों तिल माहीं तेल है, ज्यों चकमक में आग ।
तेरा प्रीतम तुझमे जाग सके तो जाग ।।

गुरू रामदासजी महाराज सांगतात :

काष्ट में ज्यों है बेसंतर मत संयम काढ कढीजे ।

लाकडाच्या आत अग्नी असतो, परंतु तो अग्नी आपणांस दिसत नाही. जेव्हा युक्तीनुसार आपण लाकडांवर लाकूड घासतो तेव्हा त्या लाकडामधूनच ठिणग्यांच्या स्वरूपात अग्नी बाहेर पडतो. तीळामध्येच तेल असते. युक्तीनुसार आपण तीळ जेव्हा घाण्यामध्ये टाकतो तेव्हा त्या तीळातून तेल निघते. संत या जगात येऊन बाह्य पूजा–अर्चेचे खंडन करतात. ते सांगतात, दगडास पुजल्याने आपणांस परमात्मा प्राप्त होत नाही. कबीर साहेब सांगतात:

आप घड़े उसे आप ही पूजे, पत्थर ने राम बनाके ।

दगडाची पूजा केल्याने जर परमात्मा प्राप्त होणार असेल, तर मी पर्वताची देखील पूजा करण्यास तयार आहे. कबीर साहेब असेही सांगतात:

पाहन परमेश्वर किया पूजे सब संसार । इस भरवासे जो रहे सो डूबे काली धार ।।

महात्मा रवीदासजी महाराज म्हणतात:

ठाकुर पूजे मुल्ल ले मन हठ तीर्थ जाए । देखा देखी स्वांग घर भूले भटका खाए ।।

संत या जगात येऊन परमात्म्याचा संदेश देतात, सत्य वचन बोलतात तेव्हा ते बोल लोकांना कडू लागते. खरेतर खडीसाखर चवीला गोड असते परंतु तापाने ग्रस्त असलेल्या मनुष्यास खडीसाखर खाण्यास दिली तर तो म्हणतो,''ती माझ्यापासून दूर न्या, मला ती नको, कारण ती कडू आहे.'' कारण त्याच्या तोंडाची चव बिघडलेली असल्याने त्यास ती कडवट लागते. याचप्रमाणे आपण बहिर्मुख होऊन रिती–रिवाज, दगडांची पूजा करीत राहिल्याने, आपले हृदयदेखील दगडासमान झाले आहे.

संत–महात्मे प्रत्येक युगात या संसारात आले. त्यांना कित्येक हालअपेष्टा भोगाव्या लागल्या तरीही त्यांच्या लिखाणात ते सत्यच लिहितात. महाराज सावन सिहंजी सांगत असत की एक महात्मा येऊन आपल्या अंतरातून दहा–वीस भ्रम दूर करतात, परंतु आपण असे विचित्र जीव आहोत की आपण आणखी वीस–पंचवीस भ्रम आपल्या अंतरामध्ये निर्माण करतो. तुमच्यासमोर संत कबीर साहेबांची वाणी सादर केली जात आहे, जी आपण अत्यंत एकाग्रतेने ऐका.

डर लागे और हांसी आवे अजब जमाना आया रे ।
धन दौलत ले माल खजाना वेश्या नाच नचाया रे ।।

कबीर साहेब सांगत आहेत,''मला भितीही वाटते व हसू देखील येते की कसे दिवस आले आहेत की आपण पाण्यात रवी (ताक घुसळण्याची रवी) घालून आयुष्यभर बसून राहतो. आपण रवीचा वापर करून पाणी कितीही घुसळले, तरी त्यातून लोणी येणार नाही. केवळ दुधापासून तयार झालेल्या ताकात रवी घुसळली तरच लोणी निघेल.

आपल्या संस्काररुपी जीवनाची सुरुवात आपल्या कुटुंबातूनच होते. माझे वडील जपजी साहेब या ग्रंथाचे पठन करीत असत. गुरू ग्रंथसाहेब या धर्मग्रंथावर त्यांचा अतिशय विश्वास होता. मी शिख कुटुंबामध्ये जन्मास आलो, त्यामुळे माझ्या जीवनाची सुरुवातही येथूनच झाली. सर्वसाधारणपणे शिख मनुष्य पाच वाण्यांचे पठन नियमित करतात. मी तर सात-आठ वाण्या जपजी साहेब, जाप साहेब, चौपई, रहरास, आसाजी की वार व सुखमनीसाहेब यांचे पठन करीत असे. सुखमनी साहेब तर मला तोंडपाठ होता. दररोज माझ्या या ग्रंथाच्या पठनाचा कार्यक्रम आठ-नऊ तास चालत असे.

मला जेव्हा बाबा बिशनदासजींनी विचारले,''हे सर्व करुन तुझे मन कधी स्थिर राहिले? अंतर्यात एखाद्या ठिणगीएवढा प्रकाश तरी पाहिला आहे का?'' त्या महात्म्यांनी खरे तर बरोबरच विचारले होते, परंतु ते सत्य मला कटू वाटले होते. आपण भाग्यवान असल्यास महात्म्यांच्या अशाप्रकारच्या कडव्या वचनांवर देखील विचार करू लागतो. मी विचार केला की महात्मा बरोबरच बोलत होते. कारण जपजी साहेब या ग्रंथपठनाने सुरुवात करीत असू तर सुखमनी साहेब ग्रंथाच्या अंतिम ओळी वाचतानाच पुन्हा लक्ष लागत असे. दरम्यानचे सात-आठ तास भानच राहत नसे की आपले मन कोठे भटकत आहे, त्या वेळात मन किती लोकांशी गप्पा मारत आहे? जवळजवळ मी माझ्या घरातील प्रत्येक नातेवाइकास मनातल्या मनात भेटून येत असे.

प्रियजनहो! त्यावेळी मी बाबा बिशनदासजींच्या आजुबाजूस एखादी प्रदक्षिणा घालावी त्याप्रमाणे फिरलो,मी जेव्हा एखादी साधना करून त्यांच्याकडे जाई तेव्हा त्याचा खरा अर्थ माझ्या लक्षात यावा म्हणून ते विचारीत असत ''काही साध्य केलेस? झाले काय?'' त्यावेळी माझे हृदय दु:खी होई की, इतकी साधना करूनही यांना मी आवडत नाही! ज्या महात्म्याने माझ्याद्वारे धुनीतप करवून घेतला होता, त्याने मला आश्वासन दिले होते की, धुनीतप केल्याने तुला शांती नक्की प्राप्त होईल. धुनी पेटवून केली जाणारी साधना अत्यंत कठीण असते. ती जून महिन्यात केली जाते, जेव्हा हिंदुस्थानात वातावरण अतिशय उष्ण असते. त्या साधनेची सुरुवात दुपारी बारा वाजता केली जाते. बैठकीत चारही बाजूस अग्नी प्रज्वलीत केला जातो. तर पाचवा डोक्यावर उष्णतेने सूर्य तळपत असतो. शरीर पूर्णपणे वस्त्रहीन असते. केवळ डोळ्यांच्या संरक्षणासाठी, त्यावर पट्टी बांधली जाते. अशी कठीण साधना करून मी बाबा बिशनदासजींकडे गेलो असता, ते म्हणाले,''प्रिय शिष्या! तुझ्या अंतर्यात तर अगोदरपासूनच पाच प्रकारचे अग्नी प्रज्वलीत आहेत. आता धुनीतपाद्वारे शरीरास भाजल्याने तुला शांती कशी लाभेल.''

माझे व्यतीत झालेले जीवन संघर्षमय जीवन होते. पूर्वी असे जप-तप करत सहन केलेल्या कठीण तहान-उपवासामुळेच आजकाल मला अशक्तपणा जाणवतो. खरेतर मला कोणत्याही प्रकारचा गंभीर आजार नाही. माझी एकूण तब्येत व्यवस्थीत आहे. परंतु अनेक दिवस अन्न ग्रहण न केल्याने व सोबत अनेक दिवस सातत्याने जागरण केल्याने पोटातील अन्नसंचयाची जागा संकुचीत होते. त्यामुळे सुग्रास अन्न खाण्याची इच्छाच नाहीशी होते. त्यासोबत आपल्या विचारांच्या प्रवाहाची दिशाच बदलते, भोगांबद्दलचे आकर्षणही नाहीसे होते. गुरु नानक देवजी सांगतात :

जिन पाया तिन पूछो भाई, सुख सतगुरु सेव कामाई हे ।

ज्याने साधना केली आहे, संघर्ष केला आहे, त्यास तुम्ही विचारा! भुकेलेल्यास अन्नाची तर तहानलेल्यास पाण्याची कदर असते. ज्याने आयुष्यात

सतगुरु प्राप्तीसाठी कठिण मेहनत घेतलेली असते, त्याचा शोध घेतलेला असतो, त्यासच सतगुरुंचे महत्त्व माहित असते. महाराज कृपालजी म्हणत, ''मनुष्य बनने अतिशय अवघड आहे, परमात्म्यास प्राप्त करणे तितकेसे अवघड नाही.'' ते जे काही म्हणत ते सत्यच होते. ते मला भेटण्यापूर्वी मला ना त्यांची स्तुती कोणी करणारा भेटला ना त्यांची निंदा करणारा भेटला. हे तर केवळ तेच जाणतात की कशाप्रकारे पाचशे किलोमीटर अंतर पार करून ते माझ्याकडे आले?

मला महाराज सावन सिंहजींच्या सत्संगामध्ये जाण्याचे त्यांच्या समिप बसण्याचे अनेकदा सौभाग्य लाभले. ते त्यांनी केलेल्या सतगुरुंच्या शोधाबद्दल सांगत की त्यांनी बावीस वर्षे सतगुरुंचा शोध घेतला. सतगुरु तर सर्वोच्च स्थानावर बसलेले असतात मग एखादा मनुष्य बावीस वर्षे त्यांचा शोध घेत असल्यास त्यांना त्यांची जाणीव नसेल काय? बाबा जयमल सिंहजी महाराज स्वत:च महाराज सावन सिंहजींकडे गेले होते.

बाह्य स्वरुपात महाराज कृपालजींना दर्शन देण्याच्या सात वर्षांपूर्वी पासून महाराज सावन सिंहजी त्यांना अंतर्यातून दर्शन देत होते. तुम्हीच विचार करा, ज्यांना इतक्या महत्प्रयासाने सतगुरु लाभतात, ते सतगुरुंच्या आज्ञेचे पालन का बरे करणार नाहीत? ते तर सतगुरुंची प्रत्येक आज्ञा शिरसांवद्य मानतात. महाराज कृपालजींना सतगुरुंच्या महिमेचे, नामाच्या महिमेचे ज्ञान होते. प्रेमींना महाराज सावन सिंहजींचे दर्शन करविण्यासाठी, नाम प्राप्त करून देण्यासाठी, महाराज कृपाल, नेहमी मदत करीत असत. आजही आपणांस अनेक प्रेमी भेटतात, जे सांगतात,''महाराज कृपालजींनी त्यांना प्रवासखर्च देऊन नाम व दर्शन प्राप्त करून घेण्यासाठी महाराज सावन सिंहजींकडे पाठविले होते.''

कबीर साहेब सांगत आहेत की, भक्ती मार्गावरुन दूरावलेल्या लोकांना परमात्म्याने धन-संपत्ती दिल्यास ते ती मद्य-मांस सेवन करण्यासाठी खर्च

करतात, परंतु परमार्थासाठी तिचा वापर करीत नाहीत. काहींनी या कार्यक्रमाची व्यवस्था व्हावी म्हणून धन खर्च केले, त्यामुळे अनेक प्रेमी ध्यान–अभ्यास करू शकले. काय परमात्मा अन्यायी आहे, जो त्या लोकांना त्या धनाच्या सेवेपासून काही लाभ होणार नाही?

मुट्ठी अन्न साध कोई मांगे कहें अनाज नेंह आया रे ।।
कथा होय ते श्रोता सोवें वक्ता मुढ़ पचाया रे ।।

कबीर साहेब प्रेमाने सांगतात,''आपण सत्संगासाठी बसलो असता, आपणांस आळस येतो, झोप येते, परंतु तेच आपण नाटक–तमाशा–सिनेमा पाहण्यासाठी बसलो तर आपली झोप कोठे पळून जाते हे कळतच नाही.''

माझा स्वानुभव आहे की, प्रत्येकाच्या आयुष्यात अशी दोन महत्वाची वळणे अनुभवास येतात, एक आपला विवाह आणि दुसरी आपल्या एखाद्या प्रिय कुटुंबियाचे निधन. एखादा भाग्यवान सत्संगीच या दोन्ही घटनांपश्चात स्थिर राहतो, नाहीतर इतर सर्वजण अशावेळी विचलित होतात.

महाराज सावन सिंहजी त्यांच्या गावी सिकन्दरपूर येते जाताना, वाटेत मुक्तसर येथून जात असत. तेथे जे काही थोडेफार सत्संगी होते, त्यांमध्ये एक संपूर्ण कुटुंब सत्संगी होते. त्या कुटुंबातील एका लहान मुलीनेदेखील महाराज सावन सिंहजींचे दर्शन घेतलेले होते. त्या मुलीची अंतिम वेळ समिप आली असता ती घरातील लोकांना म्हणाली,''अंगणामध्ये पाणी शिंपडा, महाराजजींची कार येत आहे, ते स्वत: आलेले आहेत.'' तुम्हीच विचार करा! त्या कुटुंबावर यापेक्षा अधिक काय कृपा होऊ शकते?

माझे त्या कुटुंबाशी चांगले संबंध होते. त्या कुटुंबात जेव्हा एक विवाह प्रसंग आला तेव्हा मला आमंत्रण देत ते म्हणाले, तुम्ही विवाहास नक्की यावे. खरेतर त्यावेळी माझी महाराज कृपालजींशी भेट झालेली नव्हती. मला केवळ दोन शब्दांचे नाम प्राप्त होते. मी त्यांना म्हणालो,''तुम्ही आत्ता जरुर म्हणाल की त्यावेळी आम्ही सत्संग ऐकू, महाराज सावन सिंहजींबद्दल गप्पा

गोष्टी करु, परंतु विवाहाच्या वेळी घरामध्ये काळ प्रवेश करील व तुम्हा लोकांना छडीच्या इशाऱ्यावर नाचण्यास भाग पाडेल.'' नंतर त्यांनी स्वत: मला येऊन सांगितले की त्यावेळी काळ आला होता.

इतरवेळी आपण म्हणतो की, आपले सतगुरुंवर खूप प्रेम आहे. परंतु विवाहाच्या वेळी आपण वाजंत्री वादक व नाचणाऱ्यांना बोलावतो. आपण स्वत:देखील त्यावेळी नाचतो, उड्या मारतो. मला वाटते आपण स्वत:च्या अंतरात तर सोडाच, आपल्या शेजाऱ्यांच्या अंतरात परमार्थाचा लवलेशही राहू देत नाही. तेव्हा शेजार-पाजारचे लोक टोमणे मारतात की, इतर वेळी तुम्ही सतगुरु धारण केलेले आहेत, असे म्हणत डोळे बंद करून बसता. आता मात्र तुमचे सतगुरु कोठे जातात? तुम्ही किती विचित्र वागता?

कबीर साहेब, अतिशय प्रेमाने समजावत आहेत की, कथा (सत्संग) ऐकण्याच्या वेळी आपणांस आळस येतो. परंतु नाचण्याचा, नाटक-तमाशाचा प्रसंग असता तर आपल्या आळसासही पंख फुटून तो उडून जातो.

होय जहाँ कहीं स्वांग तमाशा तनिक न नींद सताया रे।
भांग तम्बाकू सुल्फा गांजा सूफा खूब उड़ाया रे ।।

आता कबीर साहेब सांगत आहे, ''भांग, तंबाखू, सुल्फा, गांजा अशी सर्व प्रकारची व्यसने यांचा आपल्या आरोग्यावर तसेच विचारशक्तीवर वाईट परिणाम होतो. परंतु सत्संगी बनल्यावरही आपण ही व्यसने त्यागत नाही. आता तुम्हीच विचार करून पाहा!परमात्मा त्याच्या दरबाराचे द्वार आपल्यासाठी कसे उघडेल? त्यास आपण कसे बरे भेटू शकू? खरे तर सत्संगीचे जीवन इतरांसाठी आदर्शवान असावे. इतरांना विचार करण्यास भाग पडावयास हवे की हा सर्व वाईट कर्मांपासून बचावलेला आहे, हा कोणत्या संतांकडे जातो?

गुरु चरणामृत नेम न धारे मधुआ चाखड़ आया रे ।।

आपण प्रेमाने सांगता,''सतगुरुंच्या दर्शनाचा व वचनांचा **नशा** कधीही उतरत नाही. शिष्यास ना भांग पिण्याची ना मद्य सेवनाची गरज असते.

त्यास कोणत्याही नशेची गरज नसते, कारण **नामाचा नशा** ना रात्री उतरतो व ना दिवसा उतरतो. तो उतरतच नाही.''

बाबर बादशहाने गुरू नानक देवजींना कैद केले असता, त्याने गुरु नानक देवजींना धान्य दळण्याची सजा दिली होती. गुरु नानक देवजी ध्यान एकाग्र करून, डोळे मिटून ध्यानास बसले असता जाते आपोआपच फिरत राही. कोणीतरी बादशहास सांगितले की, एक फकीर ध्यान–अभ्यासामध्ये मग्न असून त्याचे जाते आपोआपच फिरत आहे. बाबर बादशहा स्वत: भांगेचे सेवन करीत असल्याने त्यास वाटले की हा फकीरदेखील भांगेच्या नशेत धुंद असावा. त्याने खुष होऊन गुरु नानक देवजींना आणखी भांग देऊ केली व म्हणाला, तुम्ही या भांगेचेही सेवन करून पहा! त्यावर गुरु नानक म्हणाले:

पोस्त अफीम भंग उतर जाए प्रभात । नाम खुमारी नानका चढ़ी रहे दिन रात ।।

गुरू नानक म्हणाले,''बादशहा तुझ्या ह्या भांग, पोस्त, अफीम यांनी केलेला नशा सकाळी उतरतो व सकाळी केलेला नशा सायंकाळी उतरतो. आम्हांस तर वाहे गुरु, अकाल पुरुषाने असा काही नशा दिलेला आहे, जो ना दिवसा उतरतो ना रात्री.'' गुरु नानकदेवजी त्यांच्या वाणीत लिहितात:

अमली जिए अमल खाए, त्यों हर जन जिए नाम ध्याए।

ज्याप्रमाणे नशापान करणाऱ्यांचा जीव नशेत असतो, त्याचप्रमाणे परमात्म्याच्या प्रियजनांचा जीव नामामध्येच असतो. सुफी संत फरीद साहेब अशा दोन आत्म्यांचे उदाहरण देऊन सांगतात, एक आत्मा दररोज अंतर्यात जाऊन सतगुरुंना भेटत असे. तो आत्मा दुसऱ्या आत्म्यास म्हणतो:

अज न सुत्ती कंत स्यों अंग मुडे मुड जाए । जाए पुच्छा दोहागणी तुम क्यों रैण बिहाए ।।

बंधु! आज सकाळी आळस केल्याने माझ्या पतीपरमेश्वराशी मी भेट घेऊ शकलो नाही, त्यांचे दर्शन केले नाही. त्यामुळे माझे शरीरास त्याचे तुकडे–तुकडे झाल्याप्रमाणे वेदना होत आहेत. अंतरामध्ये उदासिनता पसरली आहे. ज्या आत्म्याच्या अंतर्यात परमात्म्यास भेटण्याची कधीच इच्छा होत

नाही, त्या आत्म्यास मी विचारू इच्छितो की त्यांची जीवनाची काळीरात्र कशी व्यतीत होते? स्वामीजी महाराज म्हणतात :

दिन न पक मास न बरसा, कभी न दर्शन को मन तरसा ।

उलटी चलन चली दुनिया में ताँते जिआ घबराया रे ।।

कबीर साहेब सांगत आहेत, ''जगाची उलटी चाललेली चाल पाहून परमात्म्याचा संदेश देताना हृदय भितीने कंपन पावत आहे की, परमात्मा तर आपल्या अंतरात आहे, आपण मात्र त्याचा शोध बाह्य जगात घेत आहोत.''

कन्ने कुडी ग्राही हौका ऐवें ढोल बजाण सखे ।

बाबा बिशनदासजी सांगत असत की तुमच्या अंतर्यात बोलणाऱ्यास तुम्ही विचारा तर की त्याचे नाव का आहे? बाबा बिशनदासजी असे देखील म्हणत की तुमचे वडिल तुमच्या अंतर्यात बसले असून तेच तुमच्या अंतर्यात तार हालवत आहेत.

कहत कबीर सुनो भाई साधो फिर पाछे पछताया रे ।।

कबीर साहेब सांगत आहेत,''तुम्ही तुमचे आयुष्य विषयविकार भोगण्यात वाया घालविले. खरेतर हे आयुष्य तुम्ही नामाची कमाई करण्यात व्यतीत करावयास हवे होते. परमात्म्याने प्रचंड कृपा करून तुम्हास मनुष्य-जन्म दिलेला आहे, एक प्रकारचा तो हिराच आहे. सतगुरुंनी कृपा करून नामरूपी हिरा, नामाचे बक्षिस तुम्हांस दिलेले आहे, परंतु तुम्ही आळस करीत आपला मौल्यवान वेळ फालतु कामांमध्ये वाया घालवित राहिलात तर अंतसमयी मात्र पश्चाताप करावा लागेल. प्रियजनहो! कोणाचे वय पन्नास तर कोणाचे साठ वर्षे झाले आहे, तुम्हीच विचार करून पहा! आपले जीवन एखाद्या स्वप्नाप्रमाणे सरून गेले आहे, किती वर्षे व्यतीत झाली आहेत, नंतर मृत्युसमयी आपण पस्तावतो. परंतु चिमण्यांनी दाणे खाऊन शेत उध्वस्त केल्यानंतर पश्चाताप करुन काय फायदा?

***



प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे
मुंबई – १२ जानेवारी १९८७

एक प्रेमी : एका सत्संगामध्ये मी असे ऐकले होते की, गुरुंचा यमदुतांशी संवाद होतो. यमदुतांनी कोणत्या प्रकारची कर्मं केलेली असतात की ज्यामुळे त्यांना यमदुतांचा देह व ते कार्य करण्याची जबाबदारी मिळते?

बाबाजी : बंधुनो! तुम्हा सर्वांना कल्पना आहे की, या बाह्यजगात जे काही घडत आहे, ते आपल्या आंतरीक विश्वाची नक्कल आहे. सत्य आपल्या अंतर्यात असल्याने संत आपणांस ठासून सांगतात की,आपण ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाऊन सत्याचा अनुभव घ्यावा. महात्मा पीपांनी देखील सांगितले आहे की :

जो ब्रह्मंडे सोई पिंडे, जो खोजे सो पावे।

या स्थुल जगापेक्षा सुक्ष्म जग अधिक स्वच्छ व निर्मळ आहे. याजगापेक्षा तिथे अधिक सत्यता आहे. ज्याप्रमाणे स्थुल जगात मृत्युची वेळ अगोदरच ठरलेली असते, तसेच सुक्ष्म जगातही ती वेळ अगोदरच ठरलेली असते. येथे आपले आयुष्यमान कमी आहे, तर तेथे आयुष्यमान जास्त आहे.

इतिहासातील पुरावे पाहिल्यास समजते की, ब्रह्माचे किती आयुष्यमान आहे? या जगातील किती युगे आहेत व या जगातील युग ब्रह्माच्या एक दिवसासमान आहे? विष्णू व शिवाचे आयुष्यमान किती मोठे आहे? तसेच यमदूतांचे व देवतांचा राजा, इंद्राचे आयुष्य किती आहे?

जन्म–मृत्यु सुक्ष्म देशातही आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार हे दरोडेखोर तेथेदेखील प्रत्येकाच्या मागे लागले आहेत, सर्वांना अपमानित करीत आहेत. त्याचप्रमाणे कारण देश सुक्ष्म जगाहूनही अधिक निर्मळ व चांगली आहे, परंतु जन्म–मृत्यु तेथेदेखील आहे.

संतमताचा मात्र जन्म–मृत्युशी संबंध नसतो. याचा हिशोब ऋषीमुनीच करतात, कारण ते केवळ ब्रह्मस्थानापर्यंत पोहोचलेले असतात. संत स्वर्गास बिल्कुल महत्त्व देत नाही. कबीर साहेब सांगतात :

क्या नर्क क्या स्वर्ग सन्तन दोऊ रादे।
हम काहूं की काण न कढ दे अपने गुरू प्रसादे।

सतगुरू सत्संगींच्या सोबत असतात. अंतर्यातील पारमार्थिक प्रवासामध्ये सतगुरूंनी सत्संगीस सूचना दिलेल्या असतात. त्यामुळे ते सत्संगीस या मंडळांमध्ये थांबू देत नाहीत, त्यास पुढे घेऊन जातात. त्रिलोकी स्थानापर्यंत काळाचे राज्य आहे. हे यमदुत काळाच्या या राज्यातच असतात, ते काळाचेच प्रतिनिधी आहेत. काही ठराविक वेळेनंतर यांच्याही नोकरीमध्ये बदल होतो. गुरू गोविंद सिंहजी काळाच्या संदर्भामध्ये सांगतात :

काल पाए ब्रह्मा अवतारा। काल पाए शिवजी अवतारा।
काल पाए विष्णू प्रकाशा। सकल काल का किया तमाशा।

हा काळाचा एक खेळ आहे. अनुराग सागर या पुस्तकामधील या देव–देवता तसेच यमदुतांबद्दलच्या गोष्टी वाचून तुम्ही यांची कार्ये तसेच कर्तव्ये याबद्दलची माहिती करून घेऊ शकता. हिंदुस्थानातील मंदिरांमध्ये देवी–देवतांच्या मुर्ती स्थापीत केलेल्या असून, लोक त्यांच्यावर श्रद्धा ठेवतात. त्यांना संतमतामध्ये रस नसल्याने ते त्याकडे ओढले जात नाहीत, तसेच संतमतात येण्यासाठी इतरांनाही प्रेरणा देत नाहीत. त्यांचे म्हणणे असते, शिव–ब्रह्मापेक्षा कोण श्रेष्ठ असू शकतो? परंतु त्यांना जर विचारले की, ब्रह्म वा शिवा कोणत्या काळात होऊन गेले? तर याचे उत्तर त्यांच्याकडे नसते.

जसे तुम्ही सध्या हिंदुस्थानात आला आहात किंवा मी तुमच्या देशामध्ये जेव्हा येतो, तेव्हा त्या–त्या देशाने नेमणूक केलेल्या राजदूताद्वारे व्हिजा घेणे बंधनकारक असते. त्यांच्याकडे जाऊन मुलाखत द्यावी लागते. त्यानंतरच आपण एकमेकांच्या देशांमध्ये ये–जा करू शकतो.

आपणास याचीदेखील कल्पना आहे की राजदूत हा त्या देशातील सरकारचा खास विश्वासू अधिकारी असतो. त्याचप्रमाणे यमदूत हे काळाचे खास प्रतिनिधी असतात. प्रत्येक आत्म्याच्या कर्मांचा हिशोब ठेवण्याचा यांना आदेश असतो. यांचे कोणाशीही वैर नसते. प्रत्येक आत्म्याच्या कर्मांनुसार त्या आत्म्यास फळ भोगू देण्याचा त्यांना आदेश असतो. प्रत्येक राजदूत आपला अहवाल बनवून त्यांच्या सरकारला देत असतो, त्यांच्या कागदोपत्री तशी नोंद ते ठेवतात. त्याचप्रमाणे या यमदूतांचा प्रमुख, शिरोमणी देवता धर्मराज आहे. धर्मराजास नि:पक्षपणे न्याय करण्याचा, प्रत्येक आत्म्यास त्याच्या कर्मांनुसार फळ भागू देण्याचा आदेश असतो.

धर्मराजास असा देखील आदेश आहे की, त्याने परमात्म्याच्या प्रिय संतांजवळ जाऊ नये, त्यांना कसलाही जाब विचारू नये; किंबहुना त्यांचा आदरमानच करावा. एखाद्या सरकारचा खास प्रतिनीधी जेव्हा दुसऱ्या एखाद्या राज्यात गेल्यास त्याचा अतिशय मानाने आदरसत्कार केला जातो. अशाच पद्धतीची नक्कल आपल्या अंतर्यामध्ये रचलेली आहे.

काळाने तपश्चर्या करून सतपुरुषाकडे आत्म्यांची मागणी केली असता, सत्पुरुषाने त्यास आत्मा देऊन टाकले. काळाने त्या आत्म्यांसाठी तन–मनाचा पिंजरा तयार केला. त्यामुळे आपण स्वर्ग–नर्कात असो वा या नरदेहामध्ये असो, आपण तन–मनाच्या पिंजऱ्यामध्येच असतो. तनरूपी पिंजऱ्यासोबत मन असते; जेथे मन असते तेथे शांती वास करीत नाही व जेथे तन असते तेथे दु:ख व अडीअडचणी असतातच.

मी सत्संगाच्या कार्यक्रमासाठी प्रथम विश्वदौऱ्यावर घाना येथे गेलो असता, सत्संगामध्ये भारताचा तेथील राजदूतदेखील आला होता. त्याने आम्हांस त्याच्या घरी बोलावून चहापानाचा कार्यक्रम केला; आमच्याबद्दल अतिशय आपुलकी दर्शवली.

आता तुम्हीच पहा! या जगात राहाणाऱ्या अशा एखाद्या मनुष्याकडे कसली शिफारस केली, तर ती तो मंजूर करतो. त्याला आमच्याबद्दल आपुलकी होती की, हे हिंदुस्थानमधून आलेले संत आहेत, तर आपल्या हिंदुस्थानचा राजदूत असल्याने, आम्हांस त्याच्याबद्दल आपुलकी होती. तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हास समजणे सोपे जावे, म्हणूनच मी ही सांसारीक उदाहरणे देत आहे.

सर्वप्रथम मनाची जबाबदारी नेमलेली आहे की, आत्मा नामाकडे आकर्षित होऊ नये. त्यामुळे मन कोणासही भक्तीमार्गावर येऊ देत नाही. मन आपल्या अंतरात अनेक प्रकारचे भ्रम व गैरसमज निर्माण करते, ज्यामुळे आपण नेहमी अशांत व बेचैन असतो. जर आत्मा एखाद्या परिपूर्ण नसेल अशा गुरुंच्या संपर्कात आला तर आपण जेव्हा हे स्थुल जग सोडून सुक्ष्म देहात जातो, तेथे हे यमदूत मध्येच आडकाठी निर्माण करतात व आत्म्यास म्हणतात, तुला पुढे कशासाठी जायचे आहे? प्रियजनहो! काळाचे हे प्रतिनिधी अंतर्यात गेलेल्या आत्म्यास लालच देतात, तसेच भीतीही दाखवितात. या जागेचे वर्णन करीत कबीर साहेब म्हणतात :

डाकनी साकनी बहु किलकारे, सतनाम सुन भागे सारे।

येथे काळाचे हे प्रतिनिधी आत्म्यास ललकारतात, अनेकदा भयानक स्वरूप धारण करून सेवकास भीती दाखवितात. अशावेळी आपले परिपूर्ण सतगुरू सदैव आपल्यासोबत असतात. सेवक जेव्हा सतगुरूंचे स्मरण करतो, तेव्हा सतगुरू तेथे प्रगट होतात. अशातऱ्हेने शब्दनामात प्रचंड शक्ती असते. येथे पोहचलेल्या आत्म्यांना गुरु नानक देवजी आश्वासित करतात :

शब्द सुणे आहे दूरों मागे, मत हर जम मारे बे परवाहा हे।

संत–महात्मा परंपरेने सर्वांना सांगतात की, स्त्री–पुरुषांनी या जगात येऊन सावध, पवित्र राहावयास हवे. हे जेवढे पुरुषांकरीता आवश्यक आहे, तेवढेच ते स्त्रियांसाठीदेखील आवश्यक आहे. एकदा विवाह झाल्यानंतर, ते

बंधन तोडू नये, तसेच इतर ठिकाणी जाऊन विषय भोगू नये. कारण ध्यान–अभ्यास करून अंतर्यात गेल्यावर हे काळाचे प्रतिनिधी देखण्या पुरुषांचा अवतार धारण करून स्त्रियांना लालच देतात की तू पुढे जाऊन काय साध्य करणार आहेस? त्याऐवजी तू आमच्यासोबत विषयभोग करावास, आम्ही दररोज तुझी सेवा करू.

पुरुष असल्यास हे काळाचे प्रतिनिधी सुंदर स्त्रियांचे स्वरूप धारण करून त्यास लालच देतात की तू आमच्यासोबत भोग विलास केल्यास आम्ही तुला राजा बनवू, तू पुढे जाऊन काय साध्य करायचे आहे? यासाठीच संत पतीव्रता धर्मास महत्त्व देतात; कारण ज्याचे चारित्र्य या जगातच ठिक नाही, तो पुढे जाऊन नापास होतो.

तुम्ही विश्वामित्र ऋषींची गोष्ट वाचता. विश्वामित्र श्रीरामचंद्र महाराजांचा अतिशय ताकदवान सेनाप्रमुख होता. त्याने साठ हजार वर्षे अतिशय घनघोर तपश्चर्या केली होती. तो अंतर्यातून स्वर्गापर्यंत जात असे. तो स्वर्गात गेला असता, त्याची उर्वशी परीने फसवणूक केली व शकुंतलेचा जन्म झाला. पूर्वीतर विश्वामित्र व उर्वशी यांच्यावर नाटकच केले जात असे, परंतु आता चित्रपटदेखील बनविला गेला आहे की विश्वामित्राचे तपोभंग कशारीतीने झाले होते? तुम्ही पहा! स्वर्गापर्यंत पोहोचलेल्या ऋषीमुनींचा सुक्ष्म भोगांनी कशाप्रकारे घात केला व त्यांचे अध:पतन झाले? अशाच तऱ्हेने हे काळाचे प्रतिनिधी नामाची भक्ती करणाऱ्या प्रत्येक आत्म्यास रोकतात.

हे एक सत्य आहे की, जेव्हा सत्संगी नाम घेतल्यानंतरही वाईट कर्मं करतो तेव्हा काळ सतगुरूंना ते दाखवून म्हणतो की, तू त्यास नाम दिले आहे, तो किती वाईट कृत्य करत आहे. हा नाम देण्यालायक तरी होता का? तू दिलेले नाम परत घे. आत्म्याच्या भृकुटी स्थानात उजव्या बाजूस शब्दरूपी सतगुरू आणि डाव्या बाजूस काळ बसलेला असतो. येथेच त्यांची आपापसामध्ये चर्चा होते.

परंतु संतांचा नियम आहे की, जेव्हा ते एखादी गोष्ट आत्म्यास देतात, तेव्हा ती गोष्ट परत माघारी ते घेत नाहीत. जेव्हा एखादा मुलगा बदमाषी करतो तेव्हा त्याच्या वडिलांना इतर लोक म्हणतात की, तुझा मुलगा बदमाष आहे, त्यास तू घराबाहेर काढ. हे ऐकून समंजस वडिलांना वाईट वाटते की, माझ्या मुलाचे वागणे बरोबर नाही. आपल्या मुलाच्या गैरवर्तणुकीवर वडील नाराज असूनही, आपल्या मुलास घराबाहेर काढण्यास ते राजी नसतात. ते म्हणतात, मी मुलास समजावून सांगेन. याचतऱ्हेने अंतर्यामध्ये सतगुरूदेखील काळशक्तीस म्हणतात की, मी यास समजावून सांगेन, तो नक्कीच सुधारेल.

उच्चदर्जाचे सत्संगी जाणतात की या बाह्यजगातदेखील सेवकाच्या चुकांवरून संतांना लोक टोमणा मारतात की हा शिष्य तर संतांचा नामधारी आहे, सत्संगी असूनही तो गैरवर्तणूक त्यागत नाही. ज्या प्रकारे या बाह्यजगात सेवकांच्या गैरवर्तणुकींवरून संतांना खूप काही ऐकावे लागते, त्याचप्रमाणे त्यांना सेवकांवरून अंतर्यातदेखील खूप काही ऐकावे लागते.

महाराज सावन सिंहजी म्हणत असत,''सतगुरुंचा उदो उदो ते स्वत: करीत नाही तर तो त्यांच्या सेवकांच्या सद्वर्तणुकींवरून होत असतो. सतगुरूंचे सेवक जेवढे सद्वर्तनी असतील, तेवढे सतगुरुंचे नाव या जगात चमकेल, तेवढीच त्यांची अधिक वाहवा होईल.'' जे सेवक ध्यान–अभ्यास करून जिवंतपणीच अंतर्यात जातात, त्यांना कल्पना असते की, एका–एका आत्म्यासाठी सतगुरू काळाशी कसा संघर्ष करतात? कशा तऱ्हेने काळापासून आत्म्याची सुटका करून घेऊन जातात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''काळाच्या कर्जाची परतफेड करावीच लागते. मग ती परतफेड सतगुरूंनी करावी वा शिष्याने! काळ एका पैशाचीदेखील सूट देत नाही. ती परतफेड कोणत्या स्वरूपामध्ये घ्यावी? हे



देखील काळाच्या हातात असते. ते सर्वकाही संतानाच सहन करावे लागते. आपण जर जिवंतपणीच ध्यान–अभ्यास करून अंतर्यात उच्च पातळीवर गेलो नसेल, तर अंतिमवेळी थोडेसे वर गेलेल्या आत्म्याचा सांभाळ, सतगुरू तिसऱ्या तिळावर करतात. तसे न झाल्यास अंडस्थानात जाऊन ते आत्म्याचा सांभाळ करतात. परंतु कोणत्याही परिस्थितीत ते कृपा करून त्या आत्म्याचा सांभाळ नक्कीच करतात.'' मृत्युसमयी सत्संगीचे अंतरंग शांत असेल, त्याच्या आजूबाजूस सत्संगी असल्यास, अंतर्यात त्यास येत असलेला अनुभव तो नक्कीच त्यांना सांगतो. परंतु जर आजूबाजूस बेसत्संगी असल्यास वा अनेकदा त्यास असलेल्या आजारामुळे जर तो काही विशेष बोलू शकला नाही,

तरीही सतगुरू अंतर्यात त्याचा सांभाळ नक्कीच करतात. त्यावेळी सतगुरूंशी होत असलेला सर्व वार्तालाप तो आत्मा स्पष्टपणे पाहात व ऐकत असतो.

आमचे सैन्य जेव्हा अमृतसर साहब येथे होते, तेव्हाची माझ्यादेखत घडलेली एक घटना आहे. तेथे महाराज सावन सिंहजींचा एक प्रेमी शरीर सोडत होता. त्याचे ध्यान दोन्ही नेत्रांच्या पाठीमागे एकाग्र झाले होते. त्यावेळी डॉक्टरांनीदेखील त्याचा मृत्यु झाल्याचे घोषित केले. त्यामुळे जमलेले सर्वजण अंतिमविधीची तयारी करीत होते. त्या प्रेमीचे ध्यान दोन-तीन तासानंतर नेत्रांमागून पुन्हा शरीरामध्ये उतरले. तेव्हा तो सांगू लागला की, मी अंतर्यामध्ये गेलो असता, तेथे एक विशाल आकाराचा मनुष्य मोठी वही घेऊन बसला होता. त्याने सर्व वही चाळून पाहिल्यावर तो म्हणाला की, येथे याच्या कोणत्याही हिशोबाची नोंद नाही, त्यामुळे यास परत घेऊन जावे. ज्यास आणावयाचे आहे, तो दुसराच मनुष्य आहे. महाराज सावन सिंहजी जे म्हणत असत की आत्म्याच्या प्रत्येक पैशा-पैशाचा हिशोब काळ ठेवतो, ते सत्य आहे. मी स्वत: ते सर्वकाही पाहून आलो आहे.

त्या दिवसांमध्ये महाराज सावन सिंहजी अमृतसरमधील मजीठारोड येथे सत्संग करण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे पाठी करतारसिंह व भानसिंह होते. त्यावेळी त्यांचा एक सत्संगी शरीर सोडत होता. महाराजजी त्यांच्या दोन्ही पाठींना म्हणाले, ''तुम्ही तेथे जा व पहा की, मृत्युसमयी सतगुरू येतात की नाही?'' ते दोघेही तेथे गेले. त्या सत्संगीने सांगितले की, सतगुरू आले असून, आम्ही जात आहोत.

प्रियजनहो! सतगुरुंची जर अंतर्यात सचखंडापर्यंत पोहोच नसेल, तसेच ते या मृत्युदेवतांना भेटले नसतील, तर ते आपली सुटका करून कसे बरे सचखंडास नेतील? सतगुरूंचा या मृत्युदेवतांशी संपर्क असतो. अंतर्यात उजव्या बाजूस सतगुरू आहेत तर डाव्या बाजूस काळ आहे.

आत्मा जेव्हा अंतर्यात जातो तेव्हा सतगुरू हाक मारतात तर काळही हाक मारीत असतो. तुम्हांस दररोज सांगितले जाते की, तुम्ही डाव्या बाजूची हाक ऐकू नये व उजव्या बाजूच्या हाकेवर लक्ष द्यावे, कारण तुमचा मार्ग उजव्या बाजूस आहे. सतगुरू जेव्हा उजव्या बाजूने हाक मारतात, तो आत्मा त्यांच्याकडे जातो व सतगुरू त्यांचा सांभाळ करतात. ज्या आत्म्यांना नाम प्राप्त झाले नाही, सतगुरु भेटलेले नसतात, त्या आत्म्यांना याच ठिकाणी काळ हाक मारतो. आत्मा त्याच्या जवळ जातो तेव्हा काळ त्यास ताब्यात घेतो. तेथील वर्णन करताना तुलसीसाहेब सांगतात :

काल दाड़ में आई चबानी, तब ठरके नैनन में पानी।

आत्म्यास नेण्यासाठी जेव्हा सतगुरू येतात, तेव्हा त्यांचे स्वरूप प्रकाशमान, सुंदर आणि आकर्षक असते. ते स्वरूप पाहून आत्मा आनंदी होतो. दुसऱ्या बाजूस काळाचे स्वरूप अतिशय भयानक असते, त्याचे तोंड उघडलेले असते. आत्मा जेव्हा त्याच्याकडे जातो, तेव्हा तो आत्म्यास चावून-गिळून टाकतो.

सच्चखंडास पोहचलेल्या महात्म्यांच्या वाण्या आपण जेव्हा वाचतो, तेव्हा आपल्या लक्षात येते की, सतगुरू कशा रीतीने अंतर्यात आत्म्याचा सांभाळ करतात? तेव्हा काळदेखील तेथे पोहोचतो. सतगुरू अभूल शक्ती असते, त्यांच्याकडून चूक होत नाही, ते कृपाळू असतात. ते स्वत:ची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आवर्जून पोहचतात, त्यामुळे सेवकाचीदेखील जबाबदारी आहे की, त्याने प्रेमपूर्वक व मनोभावे ध्यान-अभ्यास करावा.

सतगुरूंनी दिलेल्या सूचनांनुसार आपणदेखील ध्यान-अभ्यास व नामस्मरण करावे. नामदानाच्या वेळी ज्याकाही सूचना सतगुरू आपणास देतात, त्या विधनुसार ध्यान-अभ्यास व नामस्मरण आपण करावयास हवे.

***



एकाग्रता

परम संत अजायब सिंह महाराजजींनी ध्यान-अभ्यास केलेल्या पवित्र गुहेच्या दर्शनापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश - १६पी एस राजस्थान - १२ जानेवारी ८७

तुम्ही सर्वांनी या जागेबद्दल बरेच काही ऐकले आहे तसेच संतबानी या मासिकामध्ये वाचले आहे. आपणांस या जागेच्या महानतेबद्दल समजुन घेणे महत्वाचे आहे. सिद्धांत समजुन स्वत:चा सुधार करुन घेण्याचे मत म्हणजे संतमत. संतमत केवळ वार्ता करण्याचा, व्याख्याने देण्याचा वा वाचन-पठण करण्याचा पंथ नाही, तो करणी (स्वत: नामस्मरण) करण्याचा मार्ग आहे. संत कधीही वाचन-लिखाणास नाव ठेवत नाहीत, परंतु आपण स्वनिरिक्षण करणे गरजेचे आहे की आपण जे काही वाचतो-लिहितो त्यानुसार आपण वागतो का? आपण ध्यान-अभ्यास करून अंतर्यात जातो का?इतर लोकांना उपदेश देण्याऐवजी स्वत: त्यानुसार वागणे हजारोपटीने चांगले असते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''पश्चिमी देशांतील लोकांच्या मनात फळप्राप्तीची खूप घाई असते.'' एका पश्चिमी देशातील प्रेमीने नामदान घेऊन एक महिनादेखील पुरता झाला नव्हता, तरीही त्याने महाराजजींना पत्र लिहिले की, मी दररोज ध्यान-अभ्यास करीत असूनही अंतर्यात माझी काही उन्नती झाली नाही.

महाराज सावन सिंहजी म्हणत असत,''आपल्या मनास जन्म-जन्मांतरापासून बाह्यजगात भटकण्याची सवय जडलेली आहे. त्यामुळे त्यास सुधारण्यासाठी काही दिवसांची वा काही महिन्यांची मेहनत पुरेशी नाही. त्यासाठी कदाचित आपले संपूर्ण आयुष्यदेखील व्यतीत होऊ शकते! तरीही ते बरेचसे आपल्यावर अवलंबून आहे की त्यासाठी आपण किती मेहनत घेतो, आपले आचार-विचार किती पवित्र आहेत, तसेच आपले जीवन व आपण उदरनिर्वाहासाठी कमावित असलेले धन किती पवित्र आहे?''

सतगुरुंच्या हातून कधीही चूक होत नाही, ते अभूल असतात. ते ज्या आत्म्यास नाम देतात त्यास ते विसरत नाहीत. सतगुरु शब्द–स्वरूप असतात, खरेतर परमेश्वर मनुष्य जन्म धारण करुन सतगुरु रुपात आलेला असतो. सतगुरुंना जाणीव असते की त्यांनी कोणा–कोणा प्रेमींना नाम दिले आहे, तो प्रेमी काय करीत आहे व त्यास कोणत्या गोष्टीची गरज आहे? जेव्हा आपण आवश्यकतेपेक्षा अधिक गोष्टींची लालसा करतो, तेव्हा आपण दु:खी होतो व सतगुरुंवरचा आपला विश्वास उडतो. अशास्थितीत ना आपला सतगुरुंवर विश्वास राहतो ना त्यांच्यावर प्रेम राहाते.

कोणत्याही आईस, आपल्या मुलास दु:खी पाहून, आनंद होत नाही. ती मुलाच्या हिता करीताच डॉक्टरकडून कडू औषध आणून मुलास पाजते, मुलास बरे वाटावे म्हणून त्यास आलेल्या फोडाचे ऑपरेशन करवून घेते. असे करण्यामागे तिचे वा डॉक्टरचे काही मुलाशी शत्रुत्व नसते, त्यामागे त्या मुलाचाच फायदा असतो. म्हणून आपल्या अंतरामध्ये धैर्य असणे गरजेचे आहे. हिम्मतीने दररोज ध्यान–अभ्यास करीत राहाणे गरजेचे आहे.

सत्गुरूंचे दैदीप्यमान स्वरूप, शब्दध्वनी, चंद्र, तारे, सूर्य व प्रकाश सर्व काही आपल्या अंतर्यातच आहे. आपण नामस्मरणाच्या मदतीने आपले सर्वत्र पसरलेले लक्ष, दोन्ही नेत्रांच्या दरम्यान पाठीमागे, **एकाग्र** करणे गरजेचे आहे. आपण जेव्हा **एकाग्र** होतो, तेव्हा आपण प्रकाश, तारे, सूर्य, देदीप्यमान स्वरूप सर्वकाही पाहू लागतो. परंतु जेव्हा आपले मन इतरत्र भरकटू लागते, तेव्हा आपले लक्ष त्रिकुटीहून खाली घसरते. त्यामुळे आपण ना ध्वनी ऐकू शकतो, ना प्रकाश, ना तारे पाहू शकतो. जेव्हा आपली **एकाग्रता** भंग पावते, तेव्हा अनेक दिवस आपले लक्ष **एकाग्र** होत नाही, तेव्हा आपला असा समज होतो की आपल्यावरील सत्गुरूंची असलेली कृपा–दृष्टी दुरावली आहे. अशा घाबरलेल्या मनस्थितीत आपण संतमतदेखील त्यागण्यास तयार होतो.

प्रियजनहो! सत्‌गुरूंच्या कृपादृष्टीचा वर्षाव आपल्यावर अखंडपणे होत असतो. ती कधीच खंडीत होत नाही. मग सतगुरुंनी भलेही त्यांचा देहत्याग केलेला असला तरी त्यांनी ज्यांना नाम दिलेले असते, त्या प्रेमींवर कृपादृष्टी होतच रहाते, उलट पूर्वीपेक्षाही अधिक कृपादृष्टी होते, ते अधिक चांगल्या रीतीने प्रेमींचे रक्षण करतात. परंतु आपले मन मार्गावरुन भटकते. हीदेखील आपल्या मनाचीच चलाखी असते. परंतु पुन्हा काही दिवसांनंतर जेव्हा आपल्या हृदयास झाल्या प्रकाराचा पश्चाताप होतो, तेव्हा आपण पुन्हा एकाग्र होऊ लागतो. त्या पुन्हा सत्‌गुरूंच्या होत असलेल्या कृपादृष्टीची आपणास जाणीव होते व आपण अंतर्यामध्ये प्रकाश, तारे सर्वकाही पाहू लागतो.

अनुराग सागर (मराठीत 'प्रेमाचा सागर') या पुस्तकात तुम्ही पांडवांबद्दल वाचले आहे. त्यांनी बारा वर्षे वनवास भोगला होता. त्याकाळी अशी प्रथा होती की राजकन्येचा विवाह करावयाचा असल्यास स्वयंवर रचले जात असे, ज्यामध्ये विवाहोत्सुक कौशल्यपूर्ण युवकांना आमंत्रित केले जात असे. राजकन्या तिच्या इच्छेनुसार एखाद्याच्या गळ्यामध्ये पुष्पमाळ घालीत असे, यासच विवाह–सोहळा म्हटला जाई.

अशाच प्रकारचे स्वयंवर द्रौपदीच्या वडिलांनी ठरविले. खाली तेलाने भरलेली कढई ठेवली होती. वर हवेत फिरणारा मासा ठेवला होता. अट अशी ठेवली होती की जो मनुष्य कढईतील तेलामध्ये पाहून वर फिरणाऱ्या माशाच्या डोळ्यामध्ये बाण मारेल, तोच मनुष्य द्रौपदीशी विवाह करण्यास पात्र असेल. आपणांस ठाऊक आहे की ज्याचे एकाग्रचित्त होऊ शकत असेल, तोच मनुष्य बाण वा रायफलने लक्ष्यभेद करू शकतो. ज्याचे मन अस्थिर असते, तो कधीही लक्ष्यभेद करू शकत नाही. त्या स्वयंवरामध्ये अर्जुन यशस्वी झाला त्यावेळी तो गायकाच्या वेषात होता. तुम्हास कल्पना आहे की जर एखाद्या राजाच्या मुलीचा विवाह एखाद्या गरीब पुरुषाशी झाल्यास तिच्या मैत्रिणी तिला चिडवतात. द्रौपदीस तिच्या मैत्रिणी म्हणू

लागल्या तुझा एका गायकाशी विवाह झाला, हे काही चांगले झाले नाही. परंतु द्रौपदीस रहस्य माहित होते की तो अर्जुन आहे. ती म्हणाली, तू म्हणतेस ते ठिक आहे. परंतु अशा तऱ्हने गतीने फिरणाऱ्या माशाच्या नेत्रामध्ये बाण मारण्याचे कार्य एखादा **एकाग्रचित्त** मनुष्यच करू शकतो. भविष्यात हा कदाचित विश्वविजेता होऊ शकतो,वेळ आल्यावरच ते आपणांस कळेल. खरोखरीच महाभारतातील युद्धात अर्जुन विजेता झाला.

संतमतामध्ये जेवढी अधिक आपली एकाग्रता असेल, तेवढेच आपण सतगुरु, परमात्म्याच्या समिप जाऊ शकू, शब्दध्वनी स्पष्टपणे ऐकू शकू व प्रकाशही स्पष्टपणे पाहू शकू. माझ्या सतगुरुंनी मला जे काही करण्यास सांगितले, ते मी करू शकलो हे माझे सौभाग्य आहे. हे करण्यामध्ये माझी स्वत:ची काहीच शक्ती नव्हती. हे घर मी माझ्या आवडीने बनविले नव्हते, तर तेदेखील त्यांच्या कृपेनेच बनले आहे. त्यांनी जेव्हा यामध्ये मला बसवून माझ्या नेत्रांवर हात ठेवले व मला सांगितले की, तू बाह्य जगात न पाहता अंतर्यामध्ये एकाग्र हो, तेव्हा मी त्यांना विनविले की, ''माझी लज्जा तुमच्या हातामध्ये आहे. तिचे रक्षण तुम्ही करावे.''

माझा स्वानुभव आहे की सतगुरु अभूल असतात, ते कधीही चूक करीत नाहीत. ते म्हणाले होते,''गरजेनुसार मी स्वत:च येथे येत राहीन.'' ते त्यांच्या आजारपणात देखील आंतरिक तसेच बाह्य स्वरूपाने या गरीब आत्म्याचे रक्षण करीत होते. ही त्यांची खास कृपा होती जिचे वर्णन केले जाऊ शकत नाही.

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजजींच्या अपार दयेने **अहमदाबाद** येथे **४, ५ व ६ जुलै २०१४** रोजी **ईश्वर भवन** (कॉमर्स कॉलेज क्रॉस रोड जवळ), नवरंगपुरा, अहमदाबाद (९९९८९४६२३१) येथे सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सर्व बंधूभगिनींनी संतवचनांचा लाभ घ्यावा.